स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

# शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,छत्रपती संभाजीनगर

# GOVT. DENTAL COLLEGE & HOSPITAL,CH. SAMBHAJINAGAR

पत्ता : धन्वंतरीनगर, घाटी परीसर, छत्रपती संभाजीनगर – 431 001

दुरध्वनी क्र.(०२४०) २४०२३८१/८२/८३ संकेतस्थळ-www.gdchcsn.ac.in ईमेल-gdca८३@yahoo.com

जा.क्र. शादंमरुछसं/आस्था-राजप/जाहिरात/5493-97/२०२५, दि. 27 OCT 2025

## जाहिरात

मा. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. एमईएस-१५०८/९४/०८/एमईडी, दि.०७/०९/२०११ मधील तरतुदीनुसार तसेच शासन निर्णय क्र.संकीर्ण -१०२३/प्र.क्र..२१४/वैसेवा-४, दि.१८ जानेवारी,२०२४ शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे रिक्त असलेली मुखशल्यचिकित्सशास्त्र या विषयातील रिक्त असलेले सहयोगी प्राध्यापक यांचे पद करार पध्दतीने (Contract Basis) तात्पुरत्या स्वरुपात भरण्याकरिता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

तसेच खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे मुखशल्यचिकित्साशास्त्र या विषयातील अध्यापन व रुग्णसेवा याकरिता ३६४ दिवसांकरिता सहयोगी प्राध्यापक, मुखशल्यचिकित्साशास्त्र हे रिक्त पद करार पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरणेकामी खालीलप्रमाणे नमुद अटी व शर्तीनुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

**करारपध्दतीने भरण्याकरिता उपलब्ध असलेली पदे खालीलप्रमाणे आहेत.**

| पदनाम व विषय | रिक्त पदे |
|---|---|
| सहयोगी प्राध्यापक, मुखशल्यचिकित्सशास्त्र | ०१ |

**सहयोगी प्राध्यापक या पदाकरिता निवडीची कार्यपध्दती व पात्रता:-**

१) शासकीय दंत महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील "दंतशास्त्र" विभागातील सहयोगी प्राध्यापक यावर करार पध्दतीने नियुक्तीसाठी कोणत्याही वयोगटाची यथास्थिती राष्ट्रीय दंत परिषद आणि राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.

२) उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

३) शैक्षणिक पात्रता :-

A. उमेदवाराने संबंधित विषयातील एमडीएस ही पदव्युत्तर अर्हता किंवा त्यास समकक्ष पदव्युत्तर अर्हता मान्यताप्राप्त विद्यापीठातुन उत्तीर्ण केलेली असावी. तसेच महाराष्ट्र दंत परिषद व भारतीय दंत परिषदे, नवी दिल्ली यांच्या मानंकानुसार अर्हता प्राप्त

B. तसेच उमेदवार डेंन्टिस्ट ॲक्ट,१९४८ नुसार नोंदणीकृत असावा. तसेच महाराष्ट्र राज्य दंत परिषदेचा यांच्याकडील वैधताप्राप्त नोंदणी असणे आवश्यक आहे

C. भा.दं.प. अनुसार राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय शोध निबंध गुणांक कमीत कमी २० अंक असणे आवश्यक आहे

४) अनुभव:- सहयोगी प्राध्यापक पदाकरिता सहयोगी प्राध्यापक अथवा सहाय्यक प्राध्यापक (अधिव्याख्याता) पदाचा कमीत-कमी ४ वर्षे शिकविण्याचा अनुभव असावा. (भारतीय दंत परिषद, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शिकेनुसार)

५) वयोमर्यादा:- ६५ वर्षापेक्षा कमी. (उपरोक्त शासन निर्णयातील निर्देशांनुसार) शासन निर्णय क्र. एमईएस १५०८/९४/०८/एमईडी, दि.०७/०९/२०११

६) वेतन:- सहयोगी प्राध्यापक पदाकरिता दरमहा रु. १,१०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख दहा हजार मात्र) इतके मानधन

७) सदर मानधनाव्यतिरिक्त कोणत्याही स्वरुपाचा भत्ते लागु राहणार नाहीत.

८) अर्ज सादर करावयाचा कालावधी:- दि.२९/१०/२०२५ स. ११.०० वाजेपासुन ते दि.०६/११/२०२५ सायं. ५ वाजेपर्यंत सदरहु पदासाठीचे अर्ज हे संस्थेच्या राजपत्रित आस्थापनेतील वरील कालावधीत सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध असतील

९) गुलाखतीचा दिनांक:- दि.१०/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता (सदरील मुलाखतीच्या दिनांकात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही बदल झाल्यास तसे संस्थेचे अधिकृत संकेतस्थळ gdchcsn.ac.in/med-edu.in यावर देखील प्रसिध्द करण्यात येईल)

१०) मुलाखतीचे स्थळ:- संस्थेच्या महाविद्यालयीन परिषदेच्या दालनात.

(कृ.मा.प.)

अटी व शर्ती

(शासन निर्णय क्र.संकीर्ण -१०२३/प्र.क्र..२१४/वैसेवा-४, दि.१८ जानेवारी,२०२४ मधील तरतुदीनुसार

(शासन निर्णय क्र.संकीर्ण -१०२३/प्र.क्र..२१४/वैसेवा-४, दि.१८ जानेवारी,२०२४ हे शासन निर्णय लागु राहील.)

तसेच शासन निर्णय क्र. एमईएस-१५०८/९४/०८/एमईडी, दि.०७/०९/२०११ हे शासन निर्णय लागु राहील.)

१. करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील.

२. उमेदवारांचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्ठात येईल.

३. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापन, रुग्णसेवा, विभागप्रमुख व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक आहे.

४. वरील प्रमाणे विहीत कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरित परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

५. करार पदध्तीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही तसेच सदर कालावधीत कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राहय धरला जाणार नाही.

६. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमितिक रजा अनुज्ञेय असतील.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीना त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबावत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

८. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

९. उमेदवारास प्रथम नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपुर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणाऱ्या उमेदवारास करार पध्दतीने नियुक्ती देण्यात यावी. त्यामुळे शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहित विचारात घेता उमेदवारांचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.

१०. बिगर सेवानिवृत्त गटातुन करार पध्दतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

११. अर्जदारांने संबंधित पदासाठी शारीरिकदृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

१२. सदरील सहयोगी प्राध्यापक पदांची करार तत्त्वावरील पद भरतीच्या जाहिरातीत अंशत:/पुर्णत: बदल करण्याचे अथवा सदरील जाहिरात रद्द करण्याचे सर्वाधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१३. नमुद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणे बाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना राहतील.

१४. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१५. अर्जदाराचे नाव डेंन्टिस्ट ॲक्ट, १९४८ नुसार नोंदणीकृत असावा. महाराष्ट्र राज्य दंत परिषदेचा यांच्याकडील वैधताप्राप्त नोंदणी असणे आवश्यक आहे.

१६. उमेदवारास स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित राहावे लागेल, त्यासाठी कोणत्याही स्वरुपाचा मोबदला दिल्या जाणार नाही.

१७. मुलाखतीला येताना उमेदवारांनी सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मुळ कागदपत्र सोबत आणणे बंधकारक राहील.

१८. सदरहु जाहिरात ही संस्थेचे अधिकृत संकेतस्थळ gdchcsn.ac.in/med-edu.in यावर देखील प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

(डॉ. मो. सं. इंदुरकर)
अधिष्ठाता,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

प्रति,

मा.आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत- सुचना फलक, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर.

प्रत- कार्यालयीन संकेतस्थळ, आयुक्तालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

प्रत- कार्यालयीन संकेतस्थळ, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर.

प्रत-सर्व अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, महाराष्ट्र राज्य यांना सुचना फलकावर प्रसिध्द करणेबाबत सादर.